Printed from

महाराष्ट्र टाइम्स The Maharashtra Times -Breaking news, views. reviews, cricket from across India

# देखणा दूत

9 Feb 2008, 0103 hrs IST

SMS NEWS to 58888 for latest updates

- वैष्णवी कानविंदे

हॅण्डसम आणि अपिलिंग चेहरा... जाहिराती, मालिका, चित्रपट आणि हीरो मटेरिअल असूनही तितक्याच ताकदीने नकारात्मक भूमिका निभावणारा समीर धर्माधिकारी... पत्नी अपर्णासोबत 'सलाम सिनेमा' या होम प्रोडक्शनच्या बॅनरखाली एक वेगळा विषय घेऊन येत आहे.

एकीकडे न्युक्लिअर जग तर दुसरीकडे नात्याचे लागेबांधे... आजची तरुण पिढीला वाटणा-या भावनांवर ओघवतं भाष्य करणाऱ्या 'निरोप' या मराठी चित्रपटात आजच्या तरुणाचं प्रतिनिधित्व करतोय समीर धर्माधिकारी...

बॉलिवुडमधल्या चेहऱ्यात आज अनेक मराठी तरुण वेगवेगळ्या अँगलने आपला चेहरा शोधत असतात. तसंच समीरच्या बाबतीत झालं का? नाहीतर इंजिनीअरिंगचा हुशार विद्याथीर्... एका चांगल्या कंपनीत नोकरी असूनही अचानक जाहिरातीत दिसायला कसा लागला? एक हॅण्डसम आणि अपिलिंग चेहरा म्हणून आज रेमण्ड्सच्या जाहिरातीतून समीर धर्माधिकारी समोर आला आहे. एवढंच नाहीतर इतर जाहिरातीतून सिन्सिअर नवरा आणि वडील या दोन्ही प्रतिमा त्याने नेटकेपणे पेलल्या. सोबत मराठी मालिका, मराठी/हिंदी चित्रपट आणि हीरो मटेरिअल असूनही तितक्याच ताकदीने नकारात्मक भूमिका निभावणारा समीर... पत्नी अपर्णासोबत 'सलाम सिनेमा' या होम प्रोडक्शनची निमिर्ती करून त्या बॅनरखाली एका वेगळ्या विषयाच्या मराठी चित्रपटातून बऱ्याच वर्षांनी समोर येत आहे.

' निरोप'मध्ये त्याने रंगवलेला शेखर गोखले म्हणजे आजच्या तरुणाईला रिलेट होणारा आहे. करिअरची संधी मुठीत घट्ट पकडणारा पण त्याच वेळी जुनी नाती वाळूप्रमाणे निसटताना त्या कात्रित सापडलेला हतबल तरुणाची ही कथा आहे. ही कथा सहा-सात मुख्य पात्रांभोवती फिरते आणि त्यातून ती उलगडत जाते. कथा लिहिली आहे सचिन कुंडलकरनी. आजच्या पिढीतल्या तरुणांचं प्रतिनिधित्व करणारी आणि 'बॉय नेक्स्ट डोअर' या समीरच्या चेहऱ्यात सापडणाऱ्या आपुलकीची... त्यामुळे हा चित्रपट अनेकांना आपलासा वाटेल असा विश्वास समीरला वाटतो.

जसा समीर ग्लॅमरच्या जगतात अपघाताने आला तसंच चित्रपट निमिर्तीची जबाबदारी तशाच अपघाताने त्याच्या खांद्यावर आली. आयुष्यात आलेल्या या नव्या आव्हानाला सामोरं जायला त्याला पत्नी अपर्णाची सोबत मिळाली. म्हणून या चित्रपटाबद्दल बोलताना त्याचा स्वर हळुवार होतो. कारण आतापर्यंत इतरांच्या चित्रपटात त्याने कामं केली आहेत. पण 'निरोप' सर्वस्वी त्याचं प्रोडक्शन आहे. 'हा चित्रपट करताना त्यात मी अभिनय करत असलो तरी माझ्या युनिटला काय हवं-नको ते पाहाणंही तितकंच जबाबदारीचं होतं. निमिर्तीतली इतर आव्हानं पेलत जसजसं काम पुढे गेलं तसं त्या सगळ्या गोष्टी जमत गेल्या. टेन्शनसह नवनिमिर्तीची आस असल्याने एक आगळा आनंद मिळाला, हे तितकंच खरं,' समीर सांगतो.

' निरोप' महिन्याभरात प्रदशिर्त होईल. तो लोकांना निश्चितच आवडेल याची खात्री त्याला वाटतेय आणि आतापर्यंत वेगळ्या वाटा आपल्याशा करण्याच्या प्रक्रियेत आणखी नव्या वाटा धुंडाळण्याचीही समीरला मनापासून इच्छा आहे.

' निरोप'च्या निमित्ताने त्याच्या अनुभवांच्या शिदोरीत खळखळून हसवणाऱ्या, भावूक करणाऱ्या आणि अचानक नतमस्तक करायला लावणाऱ्या असंख्य आठवणी साठल्या आहेत. शूटिंगसाठी लोकेशन शोधताना ओळखपाळख नसतानाही आपुलकीने आंबे खायला घालणारी, जेवणाच्या वेळी आलात जेवूनच जा म्हणणारी आणि लगेच पानं मांडणारी कोकणी घरं, इथे नॉन-व्हेज खाऊ नका देवाचं ठिकाण आहे असं हक्काने सांगणारी कोणी काकू... असे अनेक मजेदार आठवणींचा साठा आज त्याच्याकडे आहे. 'निरोप'मधलं 'कोकण' भेटतं ते एक व्यक्तिरेखा बनून!

यश चोप्राच्या चित्रपटात जसं परदेशात गेलेल्या नायकाचं भारतीय वतन दाखवताना हमखास पंजाबी तडका दिलेली दृश्यं दिसतात तशीच परदेशात करिअर करण्यासाठी गेलेल्या मराठी तरुणाचं मूळ कोकणातल्या कॅलिफोनिर्यातून अधोरेखित करण्याचं भान यातून पाहायला मिळतं. त्यासाठी समीरने हा लोकेशन शोधही त्या कथासूत्रा इतकाच वास्तववादी ठेवला. सध्या कोकणातल्या अनेक घरातून त्यांची मुलं शिक्षण-नोकरीनिमित्त साता समुदापार तळ ठोकून आहे. त्या मोठ्या घरात आज उरलेत फक्त म्हातारे आईवडील किंवा आत्या-काकूसारखी बुर्जुग मंडळी!

त्यामुळे विभक्त कुटुंब, करिअरच्या नव्या संधी, जागतिकीकरणाचा प्रभाव... या सगळयाच्या मुळाशी आहेत रक्ताची नातीगोती... हळूहळू अदृश्य होणाऱ्या या नात्याच्या काठावर उभ्या असणाऱ्या आणि परदेशात वास्तव्य करणाऱ्या तरुण पिढीला समीरचा 'निरोप' कदाचित त्यांच्या मातीचा निरोप घेऊन जाईल...

आणि तेच त्यांचं खरंखुरं यश असेल!

About Us | Advertise with Us | Careers @ TIL | Terms of Use | Privacy Policy | Feedback | Sitemap
Copyright © 2008 Times Internet Limited. All rights reserved. For reprint rights: Times Syndication Service
This site is best viewed with Internet Explorer 6.0 or higher Firefox 2.0 or higher at a minimum screen resolution of 1024x768